FREE JOB SUPPORT

# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई

राज्य आरोग्य सोसायटी अंतर्गत, मुंबई येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी / निव्वळ करार तत्वावर खालील पद भरावयाचे आहे: https://www.nrhm.maharashtra.gov.in & https://www.arogya.maharashtra.gov.in

| पदाचे नाव | पदाचे ठिकाण | शैक्षणिक अर्हता | कामाचा अनुभव | एकूण भरावयाची पदे व जात प्रवर्ग | वेतन / मानधन |
|---|---|---|---|---|---|
| कार्यक्रम सहाय्यक | मुंबई कार्यालय | कोणत्याही शाखेतील पदवीधर त्याचसोबत मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.व. इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. एम.एस.सी. आय.टी किंवा सी.सी.सी. | कार्यालयीन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | अज-७, भ.ज.(ब)-१, भ.ज. (क)-३, इमाव-७, खुला-२३, एकुण - ४१ | एकत्रित रुपये ९,६००/- प्रतिमाह |

टिप:- १) पदांच्या संख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. २) ही पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे असुन राज्य शासनाची पदे नाहीत. ३) मानधन हे एकत्रित वेतन आहे. ४) अर्ज छाननीअंती पात्र उमेदवारांना लेखी परिक्षा / चाचणीसाठी बोलाविण्यात येईल. लेखी परिक्षा / चाचणीसाठी पात्र उमेदवारांची यादी तसेच वेळ व दिनांक उपरोक्त संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल. ५) निवड झालेल्या उमेदवारांना ३१ मार्च २०१८ पर्यंत नेमणूक दिली जाईल. प्रकल्प पुढील वर्षी चालु राहील्यास तसेच काम समाधानकारक आढळल्यास एक दिवसाचा खंड देऊन पुढील ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पुर्ननियुक्ती दिली जाईल. पुर्ननियुक्ती न दिल्यास उमेदवार कोणत्याही स्वरुपाचा दावा करु शकत नाही, किंवा शासकिय नियमित सेवत सामावुन घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा सेवा संरक्षण संबंधी दावा करण्याचे अधिकार राहणार नाहीत. ६) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या उमेदवारास वयाची शिथिलता राहिल. ७) पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुभवाच्या मार्यदित शिथिलता करण्यात येईल. ८) वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरीता ३८ वर्ष व मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष राहिल. ९) वरील सर्व निकषात बदल करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील. उपरोक्त अर्हता धारण करण्याऱ्या इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर अर्ज करावेत:-

**आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, तिसरा मजला, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंम्पाऊंड, पी. डीमेलो रोड, मुंबई - ४०० ००१**

**अर्जदाराने ए - ४ आकाराच्या कोऱ्या कागदावर अर्ज करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असाव्यात.**

१) अर्ज केलेल्या पदाचे नाव २) ठळक अक्षरात स्वत:चे संपूर्ण नाव ३) अर्जदाराचा पुर्ण पत्ता, दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक व ई मेल आय.डी. ४) शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील जन्म तारिख ५) शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशील - अभ्यासक्रमाचे नाव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणांची टक्केवारी.

- अर्जासोबत शाळा सोडल्याच्या दाखला, शैक्षणिक अर्हता धारण केलेली व अनुभवाची सर्व कागदपत्रे सांक्षांकीत प्रतीसहित सादर करणे आवश्यक आहे. जातीचा दाखला (असल्यास) सादर करणे अनिवार्य आहे.
- अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक २०/०९/२०१७ राहिल. अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- उमेदवारांनी आपला ई मेल आय. डी. किमान एक वर्षापर्यंत चालु ठेवावा, जेणेकरुन पुढील सर्व सुचना त्यांना ईमेल आय.डी. वर देणे सोईचे होईल.

**आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, तिसरा माजला, सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंम्पाऊंड, पी. डीमेलो रोड, मुंबई - ४०० ००१**